अन्न व औषध प्रशासनातील वरिष्ठ तांत्रिक सहायक, ग्रंथपाल, वीजतंत्री, लघुलेखक (नि.श्रे) (L.G) व लघुटंकलेखक संवर्ग मृत संवर्ग म्हणून घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्र.एफडीएस-२०२६/प्र.क्र.८६/२६/औषधे-१,
९ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, लोकमान्य टिळक मार्ग,
नविन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक :- ०४ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ :-

१. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र. एफडीएस-२०१६/प्र.क्र.१३५ /१६/औषधे-१, दिनांक ०४.०९.२०२०
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. प्रानिमं १२२४/प्र.क्र.७०/सेवा-४ (का-१३-अ), दिनांक ०५.०५.२०२६

प्रस्तावना :-

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक ०५.०५.२०२६ अन्वये “किमान शासन आणि कमाल प्रशासन” (Minimum Government and Maximum Governance) या उद्दिष्टाच्या पुर्ततेसाठी पारदर्शक, भविष्योन्मुख आणि नागरिक-केंद्रित मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पदभरती प्रक्रियेत आमूलाग्र सुधारणा करणे, भरती पक्रिया सुलभ करणे याकरीता विविध प्रशासकीय विभागांच्या सर्व संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांचा अभ्यास करण्यात आला. त्यामध्ये प्रशासनिक कामकाजात, शासकीय व्यवहारात माहिती-तंत्रज्ञान कार्यप्रणालीचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढलेला आहे. अन्न व औषध प्रशासनातील वरिष्ठ तांत्रिक सहायक / Senior Technical Assistant, ग्रंथपाल / Librarian, वीजतंत्री / Electrician, लघुलेखक (नि.श्रे) / Stenographer (L.G) व लघुटंकलेखक / Stenotypist या संवर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या कालबाह्य ठरल्या असल्याने अनावश्यक ठरलेल्या संवर्गाना “मृत संवर्ग” घोषित केले असून याबाबत प्रशासकीय विभागांनी आवश्यक कार्यवाही करण्यासंदर्भात निर्देशित केले आहे.

०२. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखाली असणाऱ्या अन्न व औषध प्रशासनाचा सुधारित आकृतीबंध संदर्भ क्र.१, दिनांक ०४.०९.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेला आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या आस्थापनेवर वरिष्ठ तांत्रिक सहायक / Senior Technical Assistant, ग्रंथपाल / Librarian, वीजतंत्री / Electrician, लघुलेखक (नि.श्रे) / Stenographer (L.G) व लघुटंकलेखक / Stenotypist हे संवर्ग मंजूर आहेत. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक ०५.०५.२०२६ अन्वये दिलेल्या निर्देशास अनुसरुन अन्न व औषध प्रशासनाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ तांत्रिक सहायक / Senior Technical Assistant, ग्रंथपाल / Librarian,

वीजतंत्री / Electrician, लघुलेखक (नि.श्रे) / Stenographer (L.G) व लघुटंकलेखक / Stenotypist हे संवर्ग मृत संवर्ग घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

अन्न व औषध प्रशासनाच्या आस्थापनेवरील वरिष्ठ तांत्रिक सहायक / Senior Technical Assistant एस-१३ (३५४००-११२४००) ४५ पदे, ग्रंथपाल / Librarian एस-७ (२१७००-६९१००) ०१ पद, वीजतंत्री / Electrician एस-८ (२५५००-८११००) ०१ पद, लघुलेखक (नि.श्रे) / Stenographer (L.G) एस-१४ (३८६०० -१२२८००) ०२ पदे व लघुटंकलेखक / Stenotypist एस-८ (२५५००-८११००) १० पदे "**मृत संवर्ग**" म्हणून घोषित करण्यात येत आहे. तथापि, वरिष्ठ तांत्रिक सहायक / Senior Technical Assistant, ग्रंथपाल / Librarian, वीजतंत्री / Electrician, लघुलेखक (नि.श्रे) / Stenographer (L.G) व लघुटंकलेखक / Stenotypist या मृत संवर्गामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सेवा विषयक लाभ अबाधित राहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८०४१२२७५९२९५५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAMCHANDRA KONDIBA DHANAWADE

Digitally signed by RAMCHANDRA KONDIBA DHANAWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDD, 2.5.4.20=CF4FD1E4249E6612552DB1552E149B0688899CAC7ECC37CA9FBF60EC7D9103D6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5B10EBD8BEE2E77F1E579C83AA5378F02AE01B1765CCDD10F83CB76CD8BBE016, cn=RAMCHANDRA KONDIBA DHANAWADE
Date: 2026.08.04 14:23:14 +05'30'

(रामचंद्र धनावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. राज्यमंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) अपर मुख्य सचिव, औषधी द्रव्ये विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
६) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
७) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
८) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९) सह सचिव, औषधी द्रव्ये विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१०) सह आयुक्त (विधी), अन्न व औषध प्रशासन, मुंबई
११) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१२) कक्ष अधिकारी (सेवा-४), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३) निवडनस्ती, औषधे-१